# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २१–२०१०/ दिनांक :

श्री. गुरुमुर्ती गुरुसिध्दय्या जंगम,
मु. पो. अंकलगी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली

— विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गुरुमुर्ती गुरुसिध्दय्या जंगम, मु. पो. अंकलगी,ता. जत, जि. सांगली यांनी शेतीपंपासाठी वीज पुरवठा व्हावा म्हणून दि. १८.११.२००९ रोजी रु. ५०/– इतकी रक्कम भरुन मागणी अर्ज नोंदविला आहे. तथापि ग्राहकाने खर्च करावयाचे चलन न मिळाल्याने प्रथमत: अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली व नंतर सीजीआरएफ कोल्हापूर येथे दि. ११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. तक्रार दाखल करुन घेवून मंचाने पुढील कार्यवाही चालू केली.

मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व दि. २३.३.२०१० ही सुनावणीची तारीख मंच कार्यालयात निश्चित केली. मात्र मार्च अंतापर्यंत थकबाकी वसुलीचे काम असलेने वि.प.ने सुनावणीस हजर राहण्याचे असमर्थता दाखविली व पुढील ६.४.२०१० ही तारीख मिळावी अशी विनंती मंचास केली. मंचाने ती मान्य करुन त्याप्रमाणे ६.४.२०१० रोजी सुनावणी घेतली. ग्राहकाच्या वतीने प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित होते. वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

सुनावणीच्यावेळी वि.प.च्या वतीने असे सांगण्यात आले की, सदर ग्राहकाने अद्यापी बोअर अथवा विहीर याची व्यवस्था केलेली नाही तसेच ग्राहकाने तशा पध्दतीचा अर्ज देण्याचे कबूल केले आहे. तशा मजकुराचा अर्ज ग्राहकाच्या वतीने देण्यात येईल असे कथन केले त्यांस ग्राहकाच्या प्रतिनिधींनी दुजोरा दिला. दि. १०.५.२०१० रोजी वि.प.च्या वतीने ग्राहकाने कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय संख यांना दिलेले एक पत्र दाखल करण्यात आले. सदरच्या पत्रावर तारखेची नोंद नाही तसेच सदरचा अर्ज मंचास उद्देशून लिहीलेला नाही, मात्र त्यातील आशय मंचाने ग्राहकाचे प्रतिनिधी यांच्या समोर ठेवला व त्यांस मान्यता घेवून सदरचा अर्ज ग्राहकाच्या विनंती अर्जानुसार निकाली ठेवण्याचे मंचाने नक्की केले. आदेश पुढील प्रमाणे –

## आदेश

१) अर्जदाराच्या विनंती अर्जानुसार सदरचा तक्रार अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :